# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
# परभणी-४३१४०२ (महाराष्ट्र)

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा

## माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया
## Gardner's Training Certificate Course
## २०२०-२१

# प्रवेश माहिती पुस्तिका

अर्जा सोबत भरावयाचे शुल्कः खुला संवर्ग रू.४००/- राखीव संवर्ग रू.२००
वि.जा.(अ) भटक्या जमाती (ब), (क), (ड), इमाव, विमाप्र व एस.ई.बी.सी. व ई.डब्ल्यू.एस संवर्गा करिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक आहे.

D:\OFFICE-DATA\DMM\MTS-2020-21\Prospectus & application form MTS 2020-21\Final MTS-Prospectus-2020-21.doc

## प्रस्तावना :

कृषि क्षेत्रात फळबाग लागवडीखाली क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने व त्याची शास्त्रौक्त पध्दतीने जोपासना करण्यासाठी व शेतकऱ्यांना तांत्रिक ज्ञान ग्रामपातळीवर उपलब्ध करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने सन १९६५ या वर्षी परभणी येथे मराठवाडयासाठी माळी प्रशिक्षण योजनेस प्रारंभ केला. सदरची योजना कृषि विद्यापीठ स्थापनेनंतर विद्यापीठाकडे हस्तांतरीत करण्यात आली, सन १९७५ मध्ये ही योजना कृषि तंत्र विद्यालय, परभणी कडे वर्ग करण्यात आली. विद्यापीठाने विना अनुदान तत्वावर एक माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम कृषि तंत्र विद्यालय, औरंगाबाद येथे सन २००३ पासून कार्यान्वीत केला आहे. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षा पासून माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम (**Gardner's Training Certificate Course**) हा सुधारीत झाला आहे. या योजने अंतर्गत दरवर्षी मराठवाडयातील शेतकरी, व भुमिहीन शेतमजूर कुटूंबातील इयत्ता ९वी पास असलेल्या विद्यार्थ्यांना गुणानूक्रमे प्रवेश दिला जातो. या योजनेतील अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष मुदतीचा असून त्यात ४० टक्के बौध्दिक व ६० टक्के प्रात्यक्षिक तासिकांचा समावेश केलेला आहे. बौध्दिक तासिकेत फळझाडे, फुलझाडे, शोभेची झाडे व भाजीपाला लागवडीसंबधी माहिती दिली जाते तर प्रात्यक्षिक तासिकेत फळझाडांची अभीवृध्दी, कलमे व रोपे तयार करणे, रोपांचे संगोपन व बाग काम इत्यादीचे प्रात्यक्षिके घेतली जातात, हा अभ्यासक्रम यशस्विरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र दिले जाते.

### माळी प्रशिक्षण योजनेचे उद्येश :

१. माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतःचे शेतावर सुधारित पध्दतीने फळबाग, रोपवाटीका, फुलशेती व भाजीपाला लागवड करून आपला विकास करून घेणे.
२. ग्रामपातळीवर इतर शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन व सल्ला देवून त्यांचे उत्पादन वाढीस सहकार्य करणे.
३. शासकीय, निमशासकीय, कृषि व इतर संस्थेतील रोपवाटिका सहाय्यकाची गरज भागविणे.

### वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुविधा खालील ठिकाणी उपलब्ध आहे:

१. कृषि तंत्र विद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (अनुदानीत)
२. कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद (विना अनुदानीत)
   या अभ्यासक्रमा करिता वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परीक्षेत्रातील म्हणजे मराठवाडयातील सर्व जिल्हयातील रहिवासी उमेदवार पात्र असतील.

### प्रवेश-नियम व अटी :

१. प्रवेश पात्रता : उमेदवार इयत्ता ९ वी उत्तीर्ण.
२. वयोमर्यादा : प्रवेश घेते वेळी दि. ०१.१०.२०२० रोजी उमेदवाराचे वय ३० वर्षा पेक्षा कमी असावे. मागासवर्गीय उमेदवारांना वयाची अट पाच वर्षांनी शिथिलक्षम राहील. माजी सैनिकांसाठी प्रवेश घेते वेळी वय ४५ वर्षा पेक्षा कमी असावे.
३. प्रत्येक वर्षी माळी प्रशिक्षण केंद्र (Gardner's Training Centre) घटक व विना अनुदानीत संस्थेत ४० उमेदवारांना गुणानुक्रमे व शासन आरक्षणाच्या प्रचलीत नियमा प्रमाणे प्रवेश देण्यात येईल.
४. शैक्षणिक कालावधी- हा एक वर्षाचा आहे. अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्या पासून अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कमाल कालावधी २ वर्ष असेल. २ वर्षात अभ्यासक्रम पुर्ण केला नाही तर संबधीत अभ्यासक्रमासाठीच्या घेतलेला प्रवेश रद्द होईल.

## प्रवेश अर्ज भरण्याबाबत सुचनाः

१. प्रवेश देण्याबाबतचे प्रगटन जाहीर झाल्यानंतर उमेदवारांना विहीत शुल्क भरून प्रवेश अर्ज घटक कृषि तंत्र विद्यालय, परभणी / कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद येथून प्राप्त करता येईल.
२. आवश्यक प्रमाणपत्रासह परिपुर्ण भरलेला अर्ज टपालाने किंवा प्रत्यक्ष प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, परभणी / औरंगाबाद यांचे कार्यालयात द्यावा.
३. अर्ज दिल्यानंतर तो मिळाल्याची पोच पावती कार्यालयातून प्राप्त करून घ्यावी.
४. अर्जासोबत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत सत्यप्रती जोडाव्यात (मूळ कागदपत्रे जोडू नयेत)
५. अपूर्ण व अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही
६. अर्ज दाखल केल्यानंतर कुठलीही कागदपत्रे त्यानंतर स्विकारली जाणार नाहीत
७. टपाल दिरंगाईस / विलंबास कार्यालय अथवा विद्यापीठ जबाबदार रहाणार नाही.

## उमेदवारांची निवड :

१. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करून सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. प्रवेश कार्यक्रमाप्रमाणे कृषि तंत्र विद्यालय, परभणी व औरंगाबाद येथील कार्यालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. विद्यार्थ्यांनी प्रवेश कार्यक्रमाचे काळजीपुर्वक पालन करावे. प्रवेशा संबंधी अथवा निवडी बाबत उमेदवारास पत्राव्दारे सुचित केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
२. अर्जदारास गुणवत्ता यादीतील त्यांच्या गुणानुक्रमाबाबत तक्रार असल्यास, आपली तक्रार रूपये २५/- शुल्कासह संबधीत घटक कृषि तंत्र विद्यालय, परभणी / औरंगाबाद येथील प्राचार्यांच्या नावे प्रवेश कार्यक्रमामध्ये नमुद केलेल्या दिनांका पुर्वी सादर करावी.
३. सदरील तक्रारीची शहनिशा तक्रार निवारण समिती करेल.

| अ.क्र. | सदस्य तपशील | पदनाम |
|---|---|---|
| १ | राहयोगी अधिष्ठाता (निग्नरतर कृषि शिक्षण) | अध्यक्ष |
| २ | घटक कृषि तंत्र विद्यालयांचे प्राचार्य, (औरंगाबाद व परभणी) | सदस्य |
| ३ | उप-कुलसचिव ( विद्या) | सदस्य सचिव |

४. अंतिम गुणवत्ता यादी तयार करून सदरील यादीमधून उमेदवारांची निवड करण्यात येईल. निवडीचे वेळी शासन निर्णया प्रमाणे आरक्षण विचारात घेतले जाईल.
५. आरक्षीत जागेपैकी कुठल्याही एका प्रवर्गाचे प्रवेश अर्ज प्राप्त न झाल्यास संबधीत प्रवर्गाच्या रिक्त जागा मागासवर्गीयांच्या इतर प्रवर्गातून एकत्रीपणे विचार करून गुणानुक्रमे भरण्यात येतील.
६. उमेदवाराची निवड ही तात्पुरत्या स्वरुपाची असेल.
७. प्रवेशाबाबत विद्यापीठाचा निर्णय अंतिम राहील.

## निवड झाल्यानंतर प्रवेश घेण्याबाबतचे नियम व अटी :

१. उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्राच्या मूळ प्रती कृषि तंत्र विद्यालयात सादर केल्या पाहिजेत. मूळ कागदपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. प्रवेशाच्यावेळीच विहित सर्व शुल्क भरणे बंधनकारक आहे.
२. संशयास्पद गुणपत्रिका आढळून आल्यास त्याची तपासणी मूळ शाळेकडून करण्यात येईल व खोटी असल्यास प्रवेश अर्ज रद्य करण्यात येईल व अशा विद्यार्थ्याविरूध्द कायदेशिर कार्यवाही देखील करण्यात येईल.
३. ९ वी परीक्षा उत्तीर्णचे मूळ गुणपत्रक प्रवेश देते वेळी ग्राहय धरले जाईल.

४. प्रवेशाचे वेळी शाळा सोडण्याचा मूळ दाखलाच (टी.सी)/बोनाफाईड प्रमाणपत्र सादर करावे लागेल. बोनाफाईड वर प्रवेश घेतल्यास मुळ शाळा सोडल्याचा दाखला ०७ दिवसाच्या आत सादर करावा लागेल.अन्यथा प्रवेश रद्द होईल.
५. विद्यार्थ्याची वर्तणूक व शिस्त :- विद्यार्थी रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास पुर्वसूचना न देता विद्यालयातून काढून टाकण्यात येईल. तसेच रॅगिंगच्या नियमानुसार त्यांच्यावर कार्यवाही होईल. त्यासाठी विद्यार्थ्यानी helpline@antiragging.in साईटवर भेट देऊन रॅगिंगबाबतची संपुर्ण माहिती स्वतः अवगत करून घ्यावी. प्रत्येक विद्यालयाच्या प्राचार्यानी प्रत्येक विद्यार्थ्याचे व त्याच्या पालकाचे त्याचा प्रवेश निश्चित झाल्यावर रॅगिंगबाबतचे प्रतिज्ञापत्र ऑनलाईन पध्दतीने www. antiragging.in किंवा www.amanmovement.org या संकेतस्थळावर भरून घेणे सक्तीचे आहे.

**शुल्क परतावा :**

१. प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर वर्ग सुरू होण्यापुर्वी विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून प्रवेश प्रक्रिया शुल्का पोटी रू.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.
२. प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांने प्रवेश रद्द केल्यास रू.१०००/- + वर्ग सुरू झालेल्या महिन्या पासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्या पर्यंत दरमहा होणारे वर्ष आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबधीत विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येईल.
३. वर्ग सुरू झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास रू.१०००/- + नोंदणी केलेल्या तारखे महिन्या पासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या माहिन्या पर्यंत दरमहा होणारे वर्ष आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबधीत विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

**उपरोक्त नियमान्वये शुल्क परतावा मिळेल.**

४. माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सदर विद्यार्थ्यास त्याचा व्यक्तिगत हिशोब तपासून प्रवेशाच्या वेळी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विद्यार्थ्यांना अंतिम गुणपत्रक देते वेळी परत केली जाईल.

**खालील कारणामुळे प्रवेश अर्ज रद्द होवू शकतो :**

१. अर्जावर उमेदवाराची स्वाक्षरी नसल्यास
२. शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र / बोनाफाईड प्रमाणपत्रा शिवाय प्राप्त झालेले प्रवेश अर्ज
३. ९ वी परीक्षा पासच्या गुणपत्रिकेची प्रमाणीत प्रत जोडलेली नसल्यास
४. अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रवेश अर्ज
५. गुणपत्रिकेत किंवा इतर सोबत जोडलेल्या कागदपत्रात खाडाखोड असल्यास
६. विहीत वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असल्यास

**अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या प्रमाणीत प्रती जोडाव्यात :**

१. ९ वी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक.
२. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / बोनाफाईड प्रमाणपत्र.
३. जातीचे प्रमाणपत्र- उपजिल्हाधिकारी / उप-विभागीय अधिकारी/तहसीलदार/ तालुका दंडाधिकारी यांनी विहीत नमुन्या मध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र जोडावे.

   उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र)- विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, एस.ई.बी.सी. व ई.डब्ल्यू.एस प्रवर्गातील उमेदवारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी या पेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक ०१-०४-२०२० रोजी किंवा त्यानंतर दिलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४. अनुसूचीत जमाती (S.T. Category) च्या उमेदवारांनी प्रवेश अर्जासोबत जात प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी, प्रवेशाच्या वेळी जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५. शेती असल्याबाबतचा ७/१२ चा सन २०१८-१९ / २०१९-२० या वर्षाचा उतारा. सदरील उतारा स्वतःच्या आई / वडील / आजोबा (वडीलाकडील) यांचे नांवे असला पाहिजे. वडील हयात नसतील तर ७ अ (७/१२) भाऊ अथवा चुलते यांचे नांवे असेल तर त्यासोबत तहसीलदार यांचे समक्ष जमीन धारकाकडून प्रतिज्ञापत्र करून सदरील जमिनीत उमेदवाराचा कायदेशीर हिस्सा आहे असा उल्लेख पाहिजे.

अथवा

आई / वडील हे भूमिहीन शेतमजूर असल्यास त्यांचा पूर्ण चरितार्थ शेत मजूरीवर चालतो असे तहसीलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र (उमेदवराच्या नांवे असलेले भूमिहीन शेतमजूर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही)

६. उमेदवार प्रकल्पग्रस्त असल्यास उमेदवारांच्या नांवे जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याचे किंवा सक्षम अधिकाऱ्याचे निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र.

७. एन.सी.सी., एम.सी.सी., स्काउट व गाईड अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे जिल्हा समादेशक/ मुख्याध्यापक यांचे प्रमाणपत्र इयत्ता ९वी पर्यतचे.

८. नाटक / वादविवाद / वक्तृत्व स्पर्धामध्ये भाग घेतल्या विषयीचे जिल्हा शिक्षण अधिकारी अथवा संचालक, सांस्कृतिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे प्रमाणपत्र जोडावे इयत्त ९वी पर्यंतचे.

९. आई / वडील/ आजोबा स्वातंत्र्य सैनिक असल्यास महाराष्ट्र शासनाने दिलेले व मा. मुख्यमंत्री यांचे स्वाक्षरी असलेले सन्मानपत्राची झेरॉक्स प्रत.

१०. जे विद्यार्थी डी.टी.(अ), एन.टी. (ब,क,ड), ओ.बी.सी., एस.बी.सी., एस.ई.बी.सी. व ई.डब्ल्यू.एस.,वर्गात मोडत असून या वर्गातून प्रवेश घेत असल्यास त्यांनी अउन्नत गटाचे (नॉन क्रिमीलेयर) दिनांक १-४-२०२० त्यानंतरचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११ उमेदवाराने तालुका / जिल्हा /राज्य पातळीवर क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेतलेला असल्यास तालुका/ जिल्हा क्रिडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र इयत्ता ९वी पर्यंतचे.

१२. दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र - दिव्यांग वर्गवारीसाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याबाबतचे जिल्हाशल्य चिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाण जोडणे आवश्यक आहे.

१३. अनाथ प्रमाणपत्र- आयुक्त महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटरहेड वरील उपायुक्त (बाल विकास) पुणे / आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र

**गुणवत्तेचे मुल्यमापन :**

| **अ..क्र.** | **प्रमाणपत्राचे विवरण** | **गुण (टक्के)** |
|---|---|---|
| १. | इयत्ता ९वी पास परीक्षेत मिळालेल्या गुणांची टक्केवारी<br>(१) प्रथम भाषा - मराठी, (२) द्वितीय भाषा-हिंदी/संस्कृत, (३) तृतीय भाषा-इंग्रजी<br>(४) गणित (५) विज्ञान (६) समाजिक शास्त्र / (इ.भु.ना.शा) | शेकडा गुण |
| २. | शेतकरी किंवा भूमिहीन शेतमजूर असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र ७/१२ चा उतारा तलाठी यांनी दिलेला असावा व भूमिहीन शेतमजूराचे प्रमाणपत्र नायब तहसीलदार/ तहसीलदार यांनी दिलेले असावे. | १२ टक्के |
| ३. | एन.सी.सी./ एम.सी.सी. / स्काउट / गाईड प्रमाणपत्र इयत्ता नववी पर्यंतचे | ०२ टक्के |
| ४. | क्रिडा/सांस्कृतिक नैपुण्य/भाषा/वादविवाद इयत्ता नववी पर्यंतचे / नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतलेला असल्यास तालुका / जिल्हास्तरावरील सहभाग (इ.९ वी) | ०२ टक्के |
| ५. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी कर्मचाऱ्याचा मुलगा/मुलगी असल्यास (कुलसचिवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे) | ०३ टक्के |

**प्रवेशाबाबत राखीव जागांचा आरक्षण तपशील :**

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील तरतूदीनुसार या विद्यापीठांतर्गत संस्थेमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षीत ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व नवबौध्द | १३ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती | ०७ टक्के |
| ३ | विमुक्त जमाती (अ) (१४ व तत्सम जाती) (डी-टी-अे) | ०३ टक्के |
| ४ | भटक्या जमाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (एन.टी.ब) | २.५ टक्के |
| ५ | भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) (एन.टी.क) | ३.५ टक्के |
| ६ | भटक्या जमाती (ड) (वंजारी व तत्सम जमाती) (एन.टी.ड) | ०२ टक्के |
| ७ | इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| ८ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) | १२ टक्के |
| ९ | आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) | १० टक्के |
| | **एकूण** | **७२ टक्के** |
| १० | शेतकरी व याबाबत परिनियमाने विहीत करण्यात येतील अशा किमान किंवा कृषि विषयक अनुभव असलेली शेतकऱ्यांची मुले (अे.जी.) | ०६ टक्के |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांची मुले/ मुली/ नातू (मुलाचा मुलगा) (एफ.एफ.) | ०२ टक्के |
| १२ | प्रकल्पग्रस्तांची मुले / मुली (पी.ए.पी.) | ०४ टक्के |
| १३ | आजी व माजी सैनिकांची मुले / मुली (डी.पी.) | ०२ टक्के |
| १४ | दिव्यांग उमेदवाराकरीता (४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व) (अल्पदृष्टी, कार्णबधीर, अस्थिव्यंग, मेंदूच्या पक्षघात यापैकी योग्य उमेदवार निवडण्याचे अधिकार प्रवेश समितीस असतील) | ०५ टक्के |
| १५ | महिला | ३० टक्के |
| १६ | अनाथ | ०१ टक्के |

उपरोक्त आरक्षित जागांचा अनुशेष वेळो वेळी शासनाकडून देण्यात येणाऱ्या शासन नियमाप्रमाणे भरण्यात येईल.

**टिपः-**

(१) अ.क्र.१० ते १६ या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच अ.क्र. १६ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्तेनुसार समाविष्ठ राहील.

(२) शासन निर्णय कृषि व पदुमविभाग क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७-अे दिनांक २०-१०-२०११ मध्ये नमुद करण्यात आलेल्या जागांच्या रुपांतराच्या कार्यपध्दतीच्या धर्तीवर माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचे रुपांतर करण्यात येईल.

(३) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागेवर एकूण प्रवेशक्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. (नॉन-क्रिमिलेअर दाखला आवश्यक).

(४) रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेश क्षमतेच्या कमाल २ टक्के जागांवर प्रवेशदिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागा इतर सर्व प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात येतील, जसे अ.जा/ अ.ज./ वि.जा./ भ.ज. आणि इतर मागासवर्गीय. तथापि या पध्दतीने आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास, त्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

(५) शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक ५, दिनांक ५-६-२००६ अन्वये विमुक्त जाती अ.ब. भटक्या जमाती क.ड. त्याचबरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास वर्ग यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या सही

शिक्क्यानिशी क्रिमीलेअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही. म्हणजेच तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

(६) इतर आरक्षणांतर्गत येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७ / प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६-३-१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

(७) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांच्या मुलास प्रवेश देतांना खालील अटीचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

(१) ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा आहे तो स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाचा मुलगा / मुलगी आहे या विषयी प्रतिज्ञापत्र देण्यात यावे.

(२) सदरील प्रतिज्ञापत्रात असे विहीत करण्यात यावे की,

(अ) नामनिर्देशित करण्याची सवलत यापूर्वी मी कोणत्याही नातेवाईकासाठी वापरली नाही.

(ब) सदरील स्वातंत्र्य सैनिकाच्या नातेवाईकाला प्रवेश सवलती मिळाल्यास यापुढे मी कोणत्याही सवलती साठी इतर नातेवाईकांसाठी नामनिर्देशीत करण्याची सवलत वापरणार नाही.

(८) महाराष्ट्रातील विविध प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या व्यक्तीचें पुनर्वसन अधिनियम १९७६ यामध्ये उल्लेख केल्या प्रमाणे विस्थापीत व्यक्ती व त्यांची मुले/मुली (या जागा भरतांना समसमान गुण असल्यास कृषि विद्यापीठामुळे विस्थापीत झालेल्या व्यक्ती व त्यांची मुले यांना प्राधान्य देण्यात येईल)

**शुल्काबाबतचा तपशील :**

| अ.क्र. | शैक्षणिक शुल्क | अनुदानीत | विना अनुदानीत |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क | १००० | २००० |
| २ | प्रवेश शुल्क | २५ | १५० |
| ३ | वाचनालय शुल्क | ५० | ५० |
| ४ | जिमखाना शुल्क | ५० | ५० |
| ५ | अनामत रक्कम परत होणारी | १०० | १०० |
| ६ | परीक्षा शुल्क | ५० | ३०० |
| ७ | प्रमाणपत्र शुल्क | १० | १० |
| ८ | विद्यापीठ वैद्यकीय तपासणी शुल्क | १० | १० |
| ९ | ओळख पत्र शुल्क | २० | २० |
| १० | वसतीगृह शुल्क | १०००* | २०००* |
| ११ | भांडी शुल्क | १००* | १००* |
| १२ | मेस अनामत रक्कम | ३००* | ३००* |
| १३ | विद्यार्थी कल्याण निधी | १० | १० |
| १४ | विद्यापीठ सुरक्षा विमा हप्ता शुल्क | ०६ | ०६ |
| १५ | स्नेह संमेलन | २५ | २५ |
| | एकुण गुण | २७५६ | ५१३१ |

*** सेवा उपलब्ध असल्यास**

**टिपः**

१. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस स्वखर्चाने गणवेश (आकाशी पॅट व पांढरा हाफ शर्ट) घालुन प्रात्यक्षिकासाठी येणे आवश्यक आहे.

२ विषय प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक असणारे साहित्य (बडींग, नाईफ, सिकेटर, खुरपे, विळा) विद्यार्थ्यांनी स्वखर्चाने आणने आवश्यक आहे.

माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम केंद्र, कृषि तंत्र विद्यालय, परभणी / कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद येथील सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचा प्रवेश कार्यक्रम.

| अ.क्र. | प्रवेश कार्यक्रमाचा तपशील | दिनदर्शिकेनुसार |
|---|---|---|
| १ | अर्ज विक्री सुरूवात दिनांक | १०.०९.२०२० |
| २ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | ०१.१०.२०२० |
| ३ | तात्पूरती गुणवत्ता यादी लावण्याचा दिनांक | ०६.१०.२०२० |
| ४ | गुणवत्ता यादी संबधी तक्रार अर्ज स्विकृती करण्याचा अंतिम दिनांक | १०.१०.२०२० |
| ५ | तक्रार निवारण समितीची बैठक दिनांक | १२.१०.२०२० |
| ६ | सुधारीत गुणवत्ता यादी लावण्याचा दिनांक | १४.१०.२०२० |
| ७ | गुणवत्ता यादी प्रमाणे प्रवेश व जागा रिक्त राहील्यास संवर्ग बदलून प्रवेशाचा दिनांक | १६.१०.२०२० |
| ८ | औरंगाबाद येथे जागा रिक्त राहील्यास परभणी व औरंगाबाद येथील गुणवत्ता यादीतील प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणानुक्रमे स्थळ प्रवेश फेरीची संधी (Spot admission) | २०.१०.२०२० |
| ९ | शैक्षणिक वर्षाची सुरूवात दिनांक | २१.१०.२०२० |

**विशेष सुचनाः**

१. **दिनांक १६.१०.२०२०** रोजी सकाळी ९.०० ते १.०० वाजेपर्यंत संबधीत कृषि तंत्र विद्यालयात परभणी / औरंगाबाद येथे प्रवेश पात्र उमेदवारांनी प्रवेश अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतिसह संपूर्ण शुल्कासह हजर रहावे व **कार्यालयात हजर झाल्याची नोंद करावी**. विहित कालावधीत नोंदणी झालेल्या उमेदवारांची प्रवेश प्रक्रिया दुपारी २.०० वाजता चालु होईल त्यावेळी शुल्क व मुळ प्रमाणपत्रासह उपस्थित विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे व शासन नियमाप्रमाणे प्रवेश देण्यात येईल. दुपारी १.०० नंतर विलंबाने नोंद करणारे उमेदवार विहीत वेळेत नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशा नंतर जागा रिक्त राहील्यास गुणानुक्रमे रिक्त जागांवर प्रवेशास पात्र असतील.

२. स्थळ प्रवेश (Spot admission) फेरीची संधी-औरंगाबाद येथे जागा रिक्त राहील्यास परभणी व औरंगाबाद येथील गुणवत्ता यादीतील प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणानुक्रमे स्थळ प्रवेश फेरी ( Spot admission ) **दिनांक २०.१०.२०२०** रोजी आयोजीत करण्यात येईल. यासाठी सकाळी ९.०० ते १.०० वाजेपर्यंत कृषि तंत्र विद्यालय, औरंगाबाद येथे प्रवेश पात्र उमेदवारांनी प्रवेश अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतिसह संपूर्ण शुल्कासह हजर रहावे. **कार्यालयात हजर झाल्याची नोंद करावी**. विहित कालावधीत नोंदणी झालेल्या उमेदवारांची प्रवेश प्रक्रिया दुपारी २.०० वाजता चालु होईल त्यावेळी शुल्क व मुळ प्रमाणपत्रासह उपस्थित विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे व शासन नियमाप्रमाणे प्रवेश देण्यात येईल. दुपारी १.०० नंतर विलंबाने नोंद करणारे उमेदवार विहीत वेळेत नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशा नंतर जागा रिक्त राहील्यास गुणानुक्रमे रिक्त जागांवर प्रवेशास पात्र असतील.

**टिपः**

१. काही अपरिहार्य कारणामुळे वरील कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

२. सुधारित गुणवत्ता यादी प्रमाणे उमेदवारांनी प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, परभणी व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद कार्यालयात प्रवेशासाठी उपस्थित राहावे.